Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P014

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

# झोपडपट्टी मधील महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठीच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना : एक अभ्यास

मार्गदर्शक
**डॉ. डी.एस. धारवाडकर**
सहायक प्रध्यापक व समाजशस्त्र विभाग प्रमुख
तोष्णीवाल आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज सेनगाव
जिल्हा हिंगोली, मो. ९१३०००७४४४

**मल्लीका दिगंबर हरदडकर**
पी.एच.डी संशोधिका
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड
मो. नं. ९७६५२१२८५९

***Received on:*** *16 May ,2024* ***Revised on:*** *20 June ,2024* ***Published on:*** *30 June ,2024*

**सारांश :** मानवी जीवनाचे मुख्य दोन आधारस्तंभ आहेत. ते दोघेही समाज बनवण्याकरीता एक समान महत्वाचे आहेत आणि ते एकमेकांवर अवलंबुन असतात. जेव्हा पासून या पृथ्वीवर मानवप्राण्याचा उद्‌य आणि विकास झाला तेव्हा पासून या समाजातील पुरूष कोणत्या न कोणत्या कारणास्तव समोरे येत असते. जगातील अनेक देशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे स्त्रीयांच्या विकासासाठी अवरित प्रयत्न करत आलेला आहे. परंतु झोपडपट्टी मधील अनेक स्त्री या अशा आहेत की त्यांना आपले जीवन हे अतिशय हालाकिच्या परीस्थीतीमध्ये हालवावे लागत आहे आणि म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकार हे वेळोवेळी या झोपडपट्टी मधील महिलांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी विविध योजना तयार करत असते आणि या माध्यमातुनच त्या महिलांन सक्षमीकरणाच्या प्रवाहात आणणे शक्य आहे.

**मुख्य शब्द :** समानता, पिळवणुक, स्वातंत्र्य, जबाबदारी, महिला सक्षमीकरण, झोपडपट्टी, सामाजिक दर्जा आणि आर्थिक दर्जा.

**प्रस्तावना :**

झोपडपट्टी हा एक उच्च लोकसंख्या असेलेली शहरी निवासी क्षेत्र आहे. ज्यामध्ये कमकुवत गुणवत्तेचे दाट गृहनिर्माण असतात आणि बहुतेकदा गरिबीशी संबंधित असतात. झाोपडपटयांमधील पायाभूत सुविधा बऱ्याचदा खराब किंवा अपूर्ण असतात आणि त्यामध्ये प्रामुख्याने गरीब लोक राहतात. झोपडपटया सहा शहरी भागात वसलेल्या असल्या तरी काही देशांमध्ये त्या उपनगरी भागात असू शकतात जेथे घरांची गुणवत्ता कमी आहे आणि राहणीमान खराब आहे. झोपडपटया आकरात आणि इतर वैशिष्ट्यांमध्ये भिन्न असल्या तरी, बहुतकांमध्ये विश्वसनीय स्वच्छता सेवा, शुद्ध पाण्याचा पुरवठा, विश्वासार्ह वीज, कायद्याची अंमलबजावणी आणि इतर मूलभूत सेवांचा अभाव आहे. झोपडपटयांची निवासस्थाने झोपडपटीच्या घरांपासून व्यावसायिकपणे बांधलेल्या घरांपर्यंत बदलतात जी निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे किंवा मुलभूत देखभालीच्या अभावामुळे खराब झाली आहेत.

महाराष्ट्र शासनाकडून झोपडपट्टी वासीयांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरू करण्यात आलेली आहे. पुणे शहर हे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून आणि पिंपरी—चिंचवड हे शहर उद्योग नगरी म्हणून ओळखले जाते. पुणे आणि पिंपरी—चिंचवड या शहरामध्ये उद्योग, व्यवसाय शिक्षण

तसेच रोजगार यासाठी अन्य भागातून मोठ्या प्रमाणात लोक स्थलांतरील होतात. शहरात येणाऱ्या लोकांना त्यांच्या आर्थिक मर्यादेमुळे निवाऱ्याची उत्तम सोय उपलब्ध होत नसल्याने त्यांना झोपडपट्टीमध्ये राहणे भाब पडते. पुणे शहरामध्ये ४८६ झोपडपट्टीचा असून त्यामध्ये जवळपास १,६५००० एवढ्या कुटुंबाचे वास्तव्य असून शहराच्या एकूण लाकसंसख्येच्या सुमारे २५ टसक्के लोक झोपडपट्टीत राहत आहेत. पिंपरी—चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ७१ झोपडपट्टीमध्ये ३५२६१ कुटुंबे आहेत. झोपडपट्टीत राहणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्या समाजातील दुर्लक्षित अशा घटकातील कुटुंबाला त्यांच्या स्वप्नातील घर विनामुल्य देण्यासाठी शासनाने झोपडपट्टी व्यापलेल्या जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यासाठी जास्तीचा चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

**झोपडपट्टी मधील महिलांसाठीच्या योजना :**

**१. एकात्मिक बाल विकास सेवा योजना :**

या योजनेअंतर्गत झोपडपट्टीमधील महिलांकरीता पोषण आहार देण्यात येतो. तेथिल किशोरावस्थेतील मुली , गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांच्यापर्यंत या योजनेचा विस्तार करण्यात आलेला आहे. मुलांना तसेच त्यांच्या मातांना या योजनेमध्ये एकत्रित सेववा पुरविण्यात येते. ही योजना शहरी झोपडपट्यांमध्ये यांचा विकास करण्यात आलेला आहे. या योजनेच्या लाभार्थीना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा पुरक पोषण आहार, लसीकरण आरोग्य तपासणी, संदर्भ आरोग्य सेवा, अनौपचारीक शाला—पर्व शिक्षण आणि पोष्णण आणि आरोग्य शिक्षण इत्यादी लाभ दिले जातात.

**२. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना :**

या योजनेची उद्दिष्ट म्हणजे पूवग्रहदूषित दृष्टीकोनामुळे होणाऱ्या लिंग निवडीला प्रतिबंध करणे, मुलींच्या जिवीताची आणि संरक्षणाची खातरजमा करणे , मुलींच्या शिक्षणाची आणि सामाजिक सहभागाची खातरजमा करणे हे आहेत. देशात महाराष्ट्र हे असे राज्य आहे की, त्यामधील जळगाव आणि उस्मानाबाद जिल्ह्यांना प्रभावी समुदाय प्रतिबद्धता, प्रसूती पूर्व लिंग निदान परिरक्षण, पूर्वसंकल्पनेची अंमलबजावणी तसेच मुलींना बाळ शिक्षणात सक्षम बनविणे या क्षेत्रात उल्लेखनीय कार्यबद्दल विशेज्ञ पुरस्काराने माननीय मंत्री महिला व बाल विकास मंत्रालय भारत सरकार यांच्या हस्त दि २४ जानेवारी, २०१७ रोजी , राष्ट्रीय बालिका दिवशी सन्मानित करण्यात आले आहे.

**३. महिला समुपदेशन केंद्र :**

अत्याचार पिडितांना झालेल्या मानसिक आघातातून बाहेर पडण्यास मदत करण्यासाठी समुपदेशाची मदत पुरविण्यात येते. झोपडपट्टी मधील ज्या महिलां सोबत लैगिंक तसेच अन्य कोणत्याही प्रकारचा जरी आत्याचाराची घटना घडलेली असेल तर या महिला समुपदेशन केंद्रामार्फत त्यांना विविध प्रकारची मदत करण्यात येते आणि त्यांना योग्य ते मार्गदर्शन आणि सल्ला शासनाच्या माध्यमातुन मिळवुन दिला जात असतो.

**४. राजीव गांधी राष्ट्रीय पालळणाघर योजना :**

या योजनेमध्ये झोपडपट्टीमधील ज्या महिला या काम करण्यासाठी जातात त्यांच्यासाठी हि योजना आहे. या योजनेअंतर्गत त्यांच्या मुलांना खेळणी आणि शैक्षणिक साहित्य पुरविले जात असते. महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वाधिक पाळणाघरे हि ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्हांमध्ये आहेत आणि तयांची एकएकूण संसख्या ही ६०० ऐवढी आहे.

**५. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना :**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P014

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

या योजनेमध्ये मुख्यत: झोपडपट्टीमधील गर्भवती आणि स्तनपान कालावधीत महिलांन वेतन नुकसान भरपाई म्हणून रोख रक्कम देणे तसेच त्यांना पोषक आहार उपलब्ध करून त्यांच्या आरोग्याची स्थिती सुधारणे. गर्भवती महिलेने नोंदणी केल्यानंतर तिला शासनातर्फे मिळणारे आर्थिक लाभ घेता येतात. शासनाकडून दोन हप्तांमध्ये एकूण रूप्ये ६००० मदत दिली जाते. प्रथम प्रसुतीच्यावेळी रू. ३००० आणि बालक सहा महिण्यांचे झाल्यासवर रू ३००० देण्यात येतातन. सद्यथ्स्थतीत ही ययोजना अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यंध्ये प्रभावीपणे कार्यरत आहे.

अशा प्रकारे वरील योजना ह्या महाराष्ट्र शासनाच्या मुख्य योजना आहेत. या व्यतिरीक्त सुध्दा अनेक योजना आहेत कि ज्यांच्या माध्यमातुन महाराष्ट्र शासन हे आपल्या राज्यातील झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या महिलांसाठी तयार केल्या आहेत आणि या योजनांचा मुख्य उद्देश म्हणजे झोपडपट्टीमधील महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक दर्जा मध्ये सुधारणा करणे हा होय.

**संशोधनाचे उद्देश :**

१. झोपडपट्टीमधील महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक दर्जा चे अध्ययन करणे.
२. झोपडपट्टीमधील महिलांसाठीच्या योजनाचे अध्ययन करणे
३. महाराष्ट्र शासनाच्या झोपडपट्टीमधील महिलांनी लाभ घेतल्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक दर्जात काय सुधारणा झालेले आहे याचे अध्ययन करणे.

**नमुना निवड :**

सदर संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक विभागामधून एकूण १२० महिलांची निवड करण्यात आली आणि या महिलांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातुन माहिती गोळा करण्यात आलेली आहे. या महिलांची निवड करत असतांना नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

१. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळाल्यामुळे झोपडपट्टीमधील महीलांच्या सामाजिक आणि आर्थिक दर्जात सुधारणा झालेली आहे.
२. झोपडपट्टीमधी महिलांच्या आरोग्यामध्ये सुधारणा झालेली आहे.
३. झोपडपट्टीमधील महिला या सक्षम झालेल्या आहेत.
४. झोपडपट्टीमधील महिलांना गर्भावस्थमध्ये महाराष्ट्र शासनाकडून मदत मिळत असल्यामुळे त्यांच्यामध्ये बालमृत्यूच्या प्रमाणात कमी झालेली आहे.
५. झोपडपट्टीमधील विधवा आणि निराधार महिला शासनकडून आर्थिक मदत मिळत असल्यामुळे त्यांना त्यांच्या समाजात सन्मानाने वागवले जात आहे.

**संदर्भग्रंथ सुची :**

१. ॲड. अरूण गोविंद देशमुख : झोपडपट्टी पुर्नवसन प्राधीकरण
२. पुरूषोत्तम रोहणकर : झोपडपट्टी
३. प्रा. प्रदीप आगलावे : संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे
४. काळदाते सुधा : ग्रामिण व नागरी समाजशास्त्र
५. काचोळे दा.धो. : समाशास्त्रीय संशोधन पध्दती
६. गोटे शुभांगी : महिला सबलीकरण स्वरूप व समस्या

७. पाटील मंगला : स्त्री परीवर्तनाची अव्हाणे
८. पाटील लीला : भारतीय स्त्री जीवन
९. लोकराज्य मासिक जानेवारी २०२३
१०.लोकमत ई पेपर